# ANAMPREM Highlights

www.anamprem.org



अनामप्रेममध्ये दिव्यांग मुलांची आगळेवेगळे रक्षाबंधन..

अनामप्रेम, सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प निंबळक येथे अंध, अस्थिव्यंग व मूकबधिर मुलांनी राखीपौर्णिमा उत्साहात साजरी केली. बहिणींनी भावांना राखी बांधत आपुलकी, प्रेम व जिव्हाळा व्यक्त केला.

सांस्कृतिक उपक्रम, खेळ व मार्गदर्शनामुळे मुलांचा आनंद दुणावला. अनामप्रेम संस्था शिक्षण, प्रशिक्षण व कौशल्य विकासाद्वारे दिव्यांगांना स्वावलंबनाचा मार्ग दाखवत आहे





**अनामप्रेममध्ये देशभक्तीपर वातावरणात स्वातंत्र्य दिन साजरा.**

**अनामप्रेम – सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. या वेळी ध्वजारोहणाचा मान वीरपत्नी अंबिका भोंदे, स्वाती कावरे, फरजाना शेख तसेच ऑपरेशन सिंदूरचे माजी सैनिक श्री. सचिन बोठे व मा. विश्वासराव काळे यांना देण्यात आला.**

**विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर कार्यक्रम सादर केले तर मान्यवरांनी प्रेरणादायी मनोगते व्यक्त केली. विशेषतः वीरपत्नींचे भावनिक शब्द व सैनिकांच्या अनुभवांनी सर्वांच्या डोळ्यांत पाणी आणले.**





**अनामप्रेममध्ये दहीहंडी उत्सव जल्लोषात..**

**सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे गोपाळकाला निमित्त अंध, अपंग, अस्थिव्यंग व मूकबधिर विद्यार्थ्यांनी उत्साहात दहीहंडी साजरी केली. कान्हा-राधांच्या रूपांत सादर झालेले नृत्य-गायन, पारंपरिक वेशभूषा आणि बाळगोपाळांच्या सहभागाने प्रकल्पात गोकुळसदृश वातावरण निर्माण झाले. एकजुटीने फोडलेली दहीहंडी आनंद, संस्कृती व एकतेचे प्रतीक ठरली.**

मा. अत्रे कुटुंबीयांच्या शुभहस्ते पुणे प्रकल्पात श्री सत्यनारायण महापूजा भक्तिमय वातावरणात संपन्न.





Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM
# MARATHWADA PROJECT

AUGUST - 2025

## विविध प्रदर्शन व मान्यवरांच्या संस्था भेटी -




इनर व्हील क्लब ऑफ औरंगाबाद सेंट्रल – इन्स्टॉलेशन कार्यक्रमात अनामप्रेमची उपस्थिती..

दि. ३१ जुलै रोजी झालेल्या कार्यक्रमात अनामप्रेम संस्थेला स्टॉलसाठी आमंत्रित करण्यात आले. संस्थेच्या कार्याची माहिती देण्याची संधी मिळाली तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या नॅपकिन बुकेंची विक्री करण्यात आली.




महेश्वरी बहु मंडळ आयोजित प्रदर्शन –

प्रदर्शनाची सुरुवात उत्साहवर्धक झाली. श्री. के. बी. मुंदडा (सचिव, महेश्वरी मंडळ) व श्री. दुर्गेशजी दरक (प्रमुख, गारखेडा प्रभाग) यांनी स्टॉलला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली व पुढील सहकार्याचे आश्वासन दिले.



इनर व्हील क्लब ऑफ औरंगाबादची अनामप्रेमला भेट -
नवीन अध्यक्षा सौ. वर्षा पटेल व पदाधिकारी मंडळाने संस्थेला भेट देऊन १,००० लिटर क्षमतेचे दोन वॉटर स्टोरेज टँक सुपूर्द केले.

भेटीदरम्यान अनामप्रेमच्या कार्याची माहिती घेऊन दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या चप्पल व बुके खरेदी करून संस्थेला सहकार्य केले.



अनामप्रेमचा परिचय डॉ. रंजन गर्गे (निवृत्त प्राचार्य, अध्यक्ष – मराठी विज्ञान परिषद, लेखक, मोटिवेशनल स्पीकर) यांना करून देण्याची संधी लाभली. दीड तास झालेल्या प्रेरणादायी संवादात त्यांनी अनामप्रेमचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगून नगर प्रकल्पाला भेट देण्याचे आश्वासन दिले.



K R A Jwellers शोरुम शुभारंभ
श्री. कृष्णा राजाराम अष्टेकर ज्वेलर्सच्या शहरातील १२ व्या शोरुमच्या उद्घाटन कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली. येथे गुरू श्रीयुत आप्पासाहेब अष्टेकर व कुटुंबीयांची भेट घेऊन नॅपकिन बुके देऊन सत्कार केला, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व संस्थेच्या कार्याचा संक्षिप्त परिचय देण्यात आला.





Scanned with OKEN Scanner



## अनामप्रेममध्ये गोशाळा विभाग समितीच्या मान्यवरांची भेट -

अखिल भारतीय गोशाळा विभाग समितीचे अध्यक्ष मा. श्री. शंकरलालजी (राजस्थान) आणि सहकारी मान्यवरांनी अनामप्रेम संस्था, सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे स्वागत केले.

पाहुण्यांनी गोशाळा आणि प्रकल्पातील विविध उपक्रमांचा आढावा घेतला. श्री. शंकरलालजी यांनी गाई पालन, आयुर्वेद व निसर्गोपचार याबाबत मार्गदर्शन केले आणि गाईच्या शेणापासून विविध आरोग्य व उत्पादकता उपाय सुचवले.

येत्या काळात त्यांच्याकडून गायीच्या शेणापासून, गोमूत्रापासून तयार करण्यात येणाऱ्या उत्पादनांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.











## अनामप्रेममध्ये पारंपरिक बैलपोळा उत्सव..

सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे दिव्यांग बांधव आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत बैलपोळा सण मोठ्या आनंदात साजरा झाला.बैलांची आकर्षक सजावट, पूजा-अर्चा, हार-फुले यांनी त्यांचा सन्मान करण्यात आला.
हा सण कृतज्ञता आणि ग्रामीण संस्कृतीच्या प्रेमाचा संदेश देतो. दिव्यांग बांधवांचा श्रद्धेने भरलेला सहभाग आणि उत्साहपूर्ण वातावरणाने हा उत्सव अविस्मरणीय ठरला.







Scanned with OKEN Scanner



दि. 28 ऑगस्ट 2025, ऋषीपंचमी व श्री गजानन महाराज पुण्यतिथी निमित्त संस्थेत श्री गणेश आरतीचा सुंदर सोहळा पार पडला. या वेळी मा. श्री. संजयजी कटारिया व परिवार, मा. श्री. बाटले व परिवार तसेच संस्थेचे पालक अध्यक्ष मा. श्री. अजितजी माने व सौ. अनिता माने यांच्या हस्ते आरती झाली.



अनामप्रेम संचलित गौरांग अभिनव शाळा (अंध व अस्थिव्यंग मुलांसाठी) येथे विद्यार्थ्यांची PAT परीक्षा मोठ्या उत्साहात पार पडली.

या परीक्षेत अंध व अस्थिव्यंग मुले उत्स्फूर्तपणे सहभागी झाली. त्यांनी जिद्दीने, आत्मविश्वासाने व प्रामाणिक प्रयत्न करून या परीक्षेचे उत्तम यश प्राप्त केले आहे.

परीक्षेद्वारे मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसह त्यांच्या मानसिक, बौद्धिक व कौशल्य विकासाचे दर्शन घडले. संस्थेतील शिक्षकवर्ग व कार्यकर्त्यांनी मुलांना मार्गदर्शन करून त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.





अनामप्रेम संचलित गौरांग अभिनव शाळा (अंध व अस्थिव्यंग मुलांसाठी) येथे Toybank टॉय बॅंक सत्र आनंद आणि उत्साहात पार पडले.

या उपक्रमात मुलांना विविध शैक्षणिक खेळणी उपलब्ध करून देण्यात आली. खेळण्यांमधून मुलांचा बौद्धिक विकास, कल्पनाशक्ती, टीमवर्क, स्मरणशक्ती आणि सर्जनशीलता वृद्धिंगत होण्यास मोठी मदत झाली. अंध व अस्थिव्यंग मुलांनी या खेळण्यांचा मनसोक्त आनंद घेतला आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर पसरली.









दि. 27 ऑगस्ट 2025 रोजी गणेश चतुर्थी उत्सव संस्थेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी दिव्यांग मुलांनी “टाकाऊ पासून टिकाऊ” या संकल्पनेवर आधारित, एकही रुपया खर्च न करता सुंदर मंडपाची सजावट केली होती.

श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा मा. श्री. प्रदीपजी लाटे (संचालक, आत्मा कृषी विभाग) यांच्या हस्ते झाली. पूजा-अर्चा व आरतीनंतर सर्वांना मोदकाचा प्रसाद वाटप करण्यात आला.
यावेळी श्री. लाटे साहेब यांनी मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले.



Scanned with OKEN Scanner







अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प – नवीन विहीर उद्घाटन आणि जलपूजन -

सतत भेडसावणाऱ्या पाण्याच्या अडचणीवर मात करण्यासाठी सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प मध्ये नवीन विहिरीचे खोदकाम करण्यात आले. गेल्या काही वर्षांपासून पाणी हे आपल्यासमोर मोठे आव्हान बनले होते, परंतु या नवीन विहिरीमुळे त्या अडचणीवर मात करण्यात आली.

विहिरीला पाणी लागल्यामुळे एक छोटेखानी जलपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये संस्थेतील कार्यकर्त्यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले.







**संस्थेतील लहान वयोगटातील मुलांना आठवड्यातून दोन वेळा फिजिओथेरपी दिली जाते.**
**एकूण 12 विद्यार्थ्यांना याचा लाभ होत असून, मुलांमध्ये ही प्रगती स्पष्ट दिसत आहे.**
**यातून दिव्यांग मुलांच्या विकासाच्या वाटचालीत नवे उर्जित पाऊल टाकले जात आहे.**



# ANAMPREM Visitors













## श्रम ही श्रीराम हमारा





## घरपोहच किराणा किट योजनेअंतर्गत नगर तालुक्यातील गरजू दिव्यांगांना किराणा किटची मदत.







Scanned with OKEN Scanner

स्थापना 2005
अनामप्रेम

# अनामप्रेम – आधारग्राम
## यशवंत प्रकल्प स्पायनल कॉर्ड इंजुरी सेंटर

**AUGUST - 2025**






**अनामप्रेम यशवंत प्रकल्प – स्पायनल कॉर्ड इंजुरी पुनर्वसन केंद्रात सध्या 5 पेशंट उपचार घेत आहेत.**

**अनामप्रेम नोकरी प्रशिक्षण केंद्राची यशस्वी कामगिरी..!**
**जुलै महिन्यात Y4J प्रशिक्षण केंद्रामार्फत एकूण 22 दिव्यांग विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण करून पुणे, बारामती व छत्रपती संभाजीनगर येथे नोकरी मिळून देण्यास अनामप्रेम टीमला यश मिळाले आहे.**






Scanned with OKEN Scanner

# GANESH



## स्पायनल कॉर्ड इन्ज्युरी ते महाराष्ट्र व्हीलचेअर क्रिकेट संघात निवडीपर्यंतची स्फूर्तिदायक वाटचाल.

## गणेश अण्णा बावस्कर

कधी कधी आयुष्य आपल्यावर असे घाव घालते की जगण्याचीच इच्छा संपते. पण काही योद्धे असे असतात, जे परिस्थितीपुढे न झुकता लढण्याचा मार्ग निवडतात. अशाच खऱ्या योद्ध्यांपैकी एक आहे –
गणेश अण्णासाहेब बावस्कर.
१२ एप्रिल १९९६ रोजी जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील राजूर (गणपती) या छोट्याशा खेड्यात गणेशचा जन्म झाला. वडील शेती करत, तर आई घरकामासोबत शेतीत खांद्याला खांदा लावून मदत करत असे. तीन भावंडांत गणेश मोठा असल्याने जबाबदारीही लहानपणापासून त्याच्यावरच होती. जरी परिस्थिती हलाखीची होती, तरी गणेशच्या मनात खेळाबद्दल प्रचंड प्रेम होतं. विशेषतः फुटबॉल म्हणजे त्याचा श्वासच. शालेय जीवनात त्याने एकही फुटबॉल सामना चुकवला नाही.
क्षणभरात सगळं अंधारलं...
२०२० साली एका फुटबॉल सामन्यात खेळताना समोरच्या खेळाडूने दिलेल्या जोरदार धक्क्याने गणेश जमिनीवर कोसळला आणि क्षणभरात सगळं अंधारलं. त्याला तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी दवाखान्यात दाखल करण्यात आलं. परंतु, या अपघातामुळे त्याचे डी९, डी१०, डी११ हे मणके गंभीररीत्या दुखावले गेले आणि त्याचा मानेपासूनचा खालचा सर्व भाग अधू झाला.
डॉक्टरांनी ऑपरेशनचा मार्ग सुचवला. पण खर्च प्रचंड होता. आणि गरीब शेतकरी कुटुंबासाठी तो परवडणं अशक्य होतं. तरीही त्याच्या कुटुंबियांनी वर्षभर त्याच्यावर विविध रुग्णालयांत उपचार केले, थोडीफार फिजिओथेरपी करुन पाहिली, मात्र प्रकृतीत फारशी सुधारणा झाली नाही. त्याच्या कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांना नाईलाजाने गणेश वरील उपचार थांबवावे लागले. २०२१ पासून तो घरीच अंथरुणाला खिळून होता. दीर्घकाळ अंथरुणावर राहिल्याने त्याला बेडसोर झाले, ज्यामुळे त्याचे आरोग्य अधिकच खालावले आणि जीवनाची आशा धूसर झाली. अशातच त्याच्या घरच्यांनी त्याला शेतीतील झाडाखाली राहण्याची व्यवस्था केली. एकाकी पडलेला गणेश हळूहळू नैराश्येच्या गर्तेत बुडू लागला. दोन वेळा त्याने आत्महत्येचाही प्रयत्न केला. पण देवाला कदाचित त्याला अजून जगवायचं होतं म्हणून तो दोन्हीही वेळा वाचला.
अनामप्रेममुळे मिळाली नवसंजीवनी...
अंधारात हरवलेल्या गणेशच्या आयुष्यात अचानक एक दिवा पेटला. २०२३ मध्ये गणेशच्या भावाच्या मित्राने अनामप्रेम संस्थेच्या स्पायनल कॉर्ड इन्ज्युरी रिहॅब सेंटरबद्दल गणेशला माहिती दिली. त्याने संस्थेशी संपर्क साधताच अनामप्रेमच्या टीमने तात्काळ प्रतिसाद दिला. तेव्हा त्याची अवस्था एवढी बिकट होती की त्याला झोळी करुन आणावं लागलं. गणेश याच्यासोबत कोणताही केअरटेकर नसल्यामुळे अनामप्रेमचे कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी त्याच्या देखभालीची संपूर्ण जबाबदारी घेतली – अंथरुणावरुन व्हीलचेअरवर नेणे, आंघोळ व शौचालयाची मदत, वेळेवर औषधे देणे, आहार, आणि सर्व प्रकारची सेवा यामध्ये ते कायम तत्पर राहिले.



Scanned with OKEN Scanner

विखे पाटील हॉस्पिटलच्या डॉक्टरांकडून मिळालेल्या उत्तम फिजिओथेरपीमुळे आणि अनामप्रेम टीमच्या समर्पणामुळे गणेश याच्यात हळूहळू सुधारणा होऊ लागली. काही आठवड्यांतच त्यानी स्वतः अंथरुणावरुन व्हीलचेअरवर व व्हीलचेअरवरुन कमोडवर शिफ्ट होणे, तसेच स्वतःची कामे स्वतः करणे सुरु केले. निरंतर फिजिओथेरपी, मानसिक आधार, आणि सहकार्याच्या जोरावर तो हळूहळू उभा राहू लागला, स्टिक धरुन चालू लागला. अनामप्रेमने त्याला जगण्याचं नवं बळ दिलं.

आणि गणेश पुन्हा एकदा मैदानात उतरला...

खेळाची विशेष आवड असलेल्या गणेशला स्वस्थ बसवेना. त्याने फुटबॉल खेळणे शक्य नसल्याने इतर मैदानी खेळण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावर अनामप्रेमने त्याला व्हीलचेअर क्रिकेट खेळण्यासाठी प्रोत्साहन दिले. कोणतीही औपचारिक प्रशिक्षण नसतानाही त्याने शिर्डीमध्ये एक स्थानिक सामना खेळला, परंतु त्यात त्याला विशेष यश मिळाले नाही. मात्र, त्याने हार मानली नाही. अपयशाने खचून न जाता त्याने सात महिने अखंड सराव केला. अनामप्रेमचे इंजि. अजित माने, डॉ. प्रकाश शेठ, डॉ. मेघना मराठे, अभय रायकवाड, विक्रम प्रभू आणि उमेश पंडुरे या सर्वांनी त्यांना सतत प्रेरणा दिली आणि साथ दिली.

गणेश याने अथक मेहनत घेतली आणि महाराष्ट्र व्हीलचेअर क्रिकेट संघात सामील होण्यासाठी प्रयत्न सुरु ठेवले. २०२४ मध्ये पुण्यात राज्यस्तरीय निवड चाचणी झाली, पण पहिल्यांदा त्याची निवड थोडक्यात हुकली. आता मात्र गणेश जिद्दीला पेटला होता. अशातच हैदराबाद संघाविरुद्ध एका सामन्यादरम्यान महाराष्ट्र संघातील एक खेळाडू अनुपस्थित राहिल्यामुळे गणेश याला बोलविण्यात आहे. या संधीचे त्याने सोने केले. ४ जुलै २०२४ रोजी त्याने या सामन्यात ५८ नाबाद धावा करुन सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याच्या या उत्तम कामगिरीच्या आधारे त्याला अधिकृतरित्या महाराष्ट्र संघात स्थान मिळाले.

त्यानंतर त्याने बंगळुरु, मुंबई, ग्वाल्हेर, पुणे आणि तेलंगणा येथे महाराष्ट्र व्हीलचेअर क्रिकेट संघाचे प्रतिनिधित्व केले आणि संघाच्या विजयामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. ९ जानेवारी २०२५ रोजी तेलंगणामध्ये त्याने ६८ चेंडूत ११६ धावा ठोकत जबरदस्त कामगिरी केली. त्याच्या या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे त्याच्या नावाची शिफारस महाराष्ट्र व्हीलचेअर क्रिकेट संघाद्वारे भारतीय व्हीलचेअर क्रिकेट संघासाठी करण्यात आली आहे. आज गणेशचे एकमेव स्वप्न आहे – भारताच्या दिव्यांग क्रिकेट संघात स्थान मिळवणे आणि देशासाठी खेळणे.

आजची वास्तवातील लढाई...

गणेशचा प्रवास अजूनही सोपा नाही. त्याला दर आठवड्याला पुणे येथे सरावासाठी येतात जावे लागते. तसेच देशभरातील विविध शहरांमध्ये सामन्यांसाठी प्रवास करावा लागतो. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे त्याला प्रवास, निवास आणि इतर खर्च भागवणे खूप कठीण जाते. क्रिकेटचे साहित्य अपुरे आहे. त्यामुळे त्याला सध्या तातडीने प्रायोजकत्व (sponsorship) आवश्यक आहे. जेणेकरुन तो भारताचे प्रतिनिधित्व करताना आपली वाटचाल निर्भयपणे आणि यशस्वीरित्या पुढे नेत राहतील.

गणेशचे मनोगत...

अनामप्रेमने मला नवसंजीवनी दिली. इथे मला मानसिक-भावनिक आधार, संधी, स्थैर्य आणि जीवन जगण्याची दिशा मिळाली. संकटातून मार्ग शोधण्याचा नवा मंत्र मिळाला.

गणेशच्या भावना...

परिस्थितीने ऐकायला शिकवलं…<br>
संघर्षाने लढायला शिकवलं…<br>
वेळेने शांत राहायला शिकवलं…<br>
आणि सर्वात महत्वाचं म्हणजे...<br>
अनामप्रेमने आयुष्य जगायला शिकवलं…






अचानक दिव्यांगत्व आलेला गणेश हा फक्त क्रिकेटपटू नाही,<br>
तर तो संकटावर मात करणारा, हार न मानणारा खरा योद्धा आहे.<br>
त्याची कहाणी ही केवळ खेळातील यशोगाथा नसून,<br>
आयुष्याच्या प्रत्येक संघर्षात जिद्दीने लढणाऱ्यांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ आहे.

गणेश नेहमी म्हणतो "जोपर्यंत श्वास आहे, तोवर लढा आहे!"



Scanned with OKEN Scanner

ANAMPREM SKILL DEVELOPMENT CENTRE
UDYOG BHAVAN

# Anamprem Products



## Napkin bouquet

"दिव्यांग बांधवांनी तयार केलेले नॅपकिन बुके विक्रीसाठी उपलब्ध - त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन द्या, आणि विशेष उपक्रमात सहभागी व्हा!"

## Gir Cow Lonkadh Ghee

अनामप्रेम संस्थेच्या गोशाळेत पारंपरिक पद्धतीने तयार केलेले शुद्ध तूप आता विक्रीसाठी उपलब्ध आहे.



## Sathi chappal udyog

दिव्यांग बांधवांनी आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेलं महत्त्वाचं पाऊल - त्यांनी तयार केलेल्या साथी चप्पल विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
आपल्या खरेदीतून त्यांना प्रेरणा आणि आधार मिळेल.
कृपया पुढे येऊन हे उत्पादने खरेदी करा आणि त्यांच्या मेहनतीस हातभार लावा!











## Anamprem Crocs

अनामप्रेम परिवारातील दिव्यांग बांधवांची सुंदर निर्मिती – क्रॉक्स आता विक्रीसाठी उपलब्ध..!
आपल्या खरेदीतून त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन द्या. स्वावलंबनाच्या या प्रवासात सहभागी व्हा!



## Bahuguni Anamamrut

अनामप्रेम संस्थेचे "अनामामृत बहुगुणी थेंब" आता विक्रीसाठी उपलब्ध!
दिव्यांग बांधवांनी तयार केलेले... नैसर्गिक, सुरक्षित आणि बहुगुणी!
उपयोग:
सर्दी, खोकला, कफ, अपचन, दाढदुखी यावर गुणकारी
माऊथ फ्रेशनर म्हणूनही उत्तम!
आरोग्यवर्धक थेंब... सेवाभावातून तयार!





## Sanitary Pad

स्वच्छतेची काळजी, सन्मानाची साथ..!
अनामप्रेम संस्थेच्या उद्योग भवनात दिव्यांग बांधवांनी तयार केलेले सॅनिटरी पॅड्स आता विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
आहेत. हे पॅड्स सुरक्षित आणि आरोग्यदायी असुन स्त्रियांसाठी त्यांची खरीखुरी सखीच आहेत. स्वावलंबनाचं प्रतीक!



अनामप्रेम दिव्यांग निर्मित उत्पादने मिळवण्याकरिता व अधिक माहितीसाठी संपर्क -7350013805

www.anamprem.org

Scanned with OKEN Scanner

# दिवाळी किटच्या गोड सहकार्याने आपण दिव्यांग मुलांच्या घरात आनंदाचे दिवे पेटवू शकता

## दिव्यांगांच्या संगतीने दिवाळी व नवरात्र उत्सव करु आनंदाने..!

## अंध, अपंग व मूकबधिर बांधवांसोबत आनंदाची दिवाळी उजळवूया.









**नवरात्री उत्सव व दीपावली निमित्त**
**अनामप्रेम परिवारातर्फे आपणास व आपल्या परिवाराला हार्दिक शुभेच्छा..!**

## दिवाळी किटच्या गोड सहकार्याने आपण दिव्यांग मुलांच्या घरात आनंदाचे दिवे पेटवू शकता.

### आपण खालील स्वरुपात योगदान देऊ शकता

दिवाळी किट साहित्य
मैदा, बारीक रवा, डाळी, खाद्यतेल, जाडपोहे, खोबरे, तुप, साखर, गुळ, तांदुळ, खसखस, जायफळ, चारोळी, मनुके, तयार फराळ.
सुगंधी तेल, उटणे, सुगंधी साबण, छोटे कंदील, पणत्या, पांढरी रांगोळी व रंग इ.
मेहंदी कोन, पावडर,
मुला मुलींच्या गरजेच्या वस्तू
( उदा. डोक्याचा क्लचर, टिकल्या, मुला मुलींसाठी रुमाल, कंगवा )
आर्थिक मदत – शिक्षण व स्वावलंबनासाठी

### संपर्क

गांधी मैदान – 9422054956
सत्यमेव जयते ग्राम – 7350013805
पुणे प्रकल्प – 9011750022
छ. संभाजीनगर प्रकल्प – 9011750035

@anamprem www.anamprem.org

## ANAMPREM CONTACT & BANK DETAILS

- Himmat Bhavan Project - 7350013806 , 9011004576
- S.J Gram Project - 7350517778 , 9011670123
- Marathwada Project. - 9921509199 , 9011750035
- Anamprem Pune Hostel. - 9422307116 , 9011750022

| | |
|---|---|
| बँकेचे नांव Bank Name | सेंट्रल बँक ऑफ इंडिया Central Bank of India |
| शाखा Branch | अहमदनगर (महा) Ahmednagar (MH) |
| खाते क्रमांक/A/c No. : 3486669726 | |
| आय.एफ.एस.सी.कोड/IFSC Code : CBIN0280670 | |

ANAMPREM
10252110@cbin

हे मासिक पत्रक मा.अध्यक्ष अनामप्रेम गांधी मैदान, अहिल्यानगर येथून प्रकाशित केले आहे.

/ANAMPREM

YOU TUBE INSTAGRAM FACEBOOK

Scanned with OKEN Scanner